

<u>प्रेस नोट</u> दिनांक २४/१२/२०२०

**लग्न समारंभातून चोरी झालेले ४२ तोळे सोने परराज्यात जावून हस्तगत करण्यात कासारवडवली पोलीसांना यश**

कासारवडवली पोलीस स्टेशन हददीमध्ये दिनांक ३०/११/२०२० रोजी जलसा लॉन घोडबंदर रोड, ओवळा याठिकाणी श्रीमती अनिता ओमविर सिंग, राह. ठाणे यांचा मुलगा सचिन यांचा लग्न समारंभ चालू होता. लग्न समारंभात फोटो काढत असतांना श्रीमती अनिता सिंग यांनी खुर्चीवर ठेवलेली सोन्याच्या दागिन्यांची बॅग काही क्षणातच कोणीतरी चोरी करून पळाले होते. सदर बॅग मध्ये सोन्याचे दागिने होते. दागिने चोरी झाल्याबाबत कासारवडवली पोलीस स्टेशनला दिनांक ०१/१२/२०२० रोजी श्रीमती अनिता सिंग यांनी दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा नोंद क्रमांक I ३००/२०२० भादंवि कलम ३७९ प्रमाणे नोंद करण्यात आला.

गुन्हयाच्या तपासामध्ये सदरचा गुन्हा हा पचोर, जिल्हा : राजगढ येथील अट्टल गुन्हेगार नामे बबलू सुमेरसिंग सिसोदिया व त्याचे इतर ०२ साथीदार यांनी केला असल्याचे निष्पन्न झाले. कासारवडवली पोलीस स्टेशनचे सपोनि/शहादेव पालवे व टिम असे राजगढ जिल्हयात गुलखेडी, ता. पचोर या ठिकाणी तपासकामी गेले. पोलीसांनी गुलखेडी, ता. पचोर, जि. राजगढ येथे बबलू सुमेरसिंग सिसोदिया याचे घरातून या गुन्हयात चोरी झालेले सुमारे ४२३ ग्रॅम वजनाचे खालील वर्णनाचे दागिने हस्तगत केले.

<u>दागिन्यांचे वर्णन</u> :

१) रू. १,५७,५००/- किंमतीचे अंदाजे ३५ ग्रॅम वजनाचे काळे मनी असलेले पिवळ्या धातूचे मनी मंगळसुत्र जु.वा.कि.सु.

२) रू. २७,०००/- किंमतीचे अंदाजे ६ ग्रॅम वजनाची पिवळ्या धातूची बिंदी जु.वा.कि.सु.

३) रू. २,९२,५००/- किंमतीचे अंदाजे ६५ ग्रॅम वजनाचे पिवळया धातूचे २ कडे जु.वा.कि.सु.

४) रू. १,५७,५००/- किंमतीचे अंदाजे ३५ ग्रॅम वजनाचे पिवळया धातूचे १ हाथफुल जु.वा.कि.सु.

५) रू. १,६२,०००/- किंमतीचे अंदाजे ३६ ग्रॅम वजनाचे पिवळया धातूचा १ रानीहार जु.वा.कि.सु.

६) रू. १,२१,५००/- किंमतीचे अंदाजे २७ ग्रॅम वजनाचा पिवळया धातूचा १ बाजुबंन्द जु.वा.कि.सु.

७) रू. ४५,०००/ -किंमतीचे अंदाजे १० ग्रॅम वजनाची पिवळया धातूची १ नथनी जु.वा.कि.सु.

८) रू. १,८०,०००/- किंमतीचे अंदाजे ४० ग्रॅम वजनाचे पिवळया धातूचे २ कडे जु.वा.कि.सु.

९) रू. ५,४०,०००/-किंमतीची अंदाजे १२० ग्रॅम वजनाचे पिवळया धातूची १ कमरधनी जु.वा.कि.सु.

१०) रू. १,८०,०००/- किंमतीचा अंदाजे ४० ग्रॅम वजनाचा पिवळया धातूचा हार कानातल्यासहित जु.वा.

११) रू. ४०,५००/- किंमतीच्या एकूण ९ ग्रॅम वजनाच्या ३ पिवळया धातूच्या अंगठया. प्रत्येकी अंदाजे ३ ग्रॅम वजनाच्या, जु.वा.कि.सु.

---

**रू. १९,०३,५००/-एकूण अंदाजे किंमतीचे व एकूण अंदाजे ४२३ ग्रॅम वजनाचे.**

अशा प्रकारे कासारवडवली पोलीसांनी गुन्हयात चोरीस गेलेले एकूण अंदाजे ४२३ ग्रॅम वजनाचे व अंदाजे १९,०३,५००/- किमतीचे सोन्याचे सर्व दागिने हस्तगत करून उत्कृष्ठ कामगिरी केलेली आहे.

नमुद कारवाई मा.पोलीस आयुक्त श्री.विवेक फणसळकर सो., मा.सह पोलीस आयुक्त. श्री.सुरेश कुमार मेकला सो., मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे श्री.अनिल कुंभारे सो., मा.पोलीस उपायुक्त डॉ. विनयकुमार मे. राठोड सो., मा.सहा. पोलीस आयुक्त, वर्तक नगर विभाग श्री.पंकज शिरसाठ सो. यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर खैरनार, पो.नि.जयराज रणवरे, पो.नि.अविनाश काळदाते, पो.नि. वैभव धुमाळ, स.पो.नि. सागर जाधव, स.पो.नि.शहादेव पालवे, पोहवा/५४०८ उदय कोरे, पो.हवा./३७३२ आर. एस.चौधरी, पोना /२४८४ तुषार पाटील, पोना/२४८४ रविंद्र रावते, पोना/२२०७ रमेश जाधव, पोना/६९३३ संतोष गायकवाड,पोहवा/६२१७ राजकुमार पाटील, पोहवा/५४४७/सुजित खरात, पोना/३०४३/महेंद्र लिंगाळे,पोना/२८११/मनोज पवार, पोना/१२६३/प्रमोद तायडे, पोना/१७८ महापुरे, पोशि/१६३० मनोज महाजन यांनी केलेली असून गुन्ह्याचा पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक शहादेव पालवे हे करीत आहेत

-----00000-----

CS Scanned with CamScanner